# सहकारातील हस्तक्षेप

मल्टी स्टेट को - ऑप. सोसायटी ॲक्ट २००२ हा सहकार कायदा ज्या सहकारी संस्थांचे कार्यक्षेत्र एका राज्याहुन अधिक आहे त्यांना लागू होतो. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० हा कायदा महाराष्ट्र राज्यात नोंदणीकृत सर्व सहकारी संस्थांना लागू होतो. प्रामुख्याने सहकारी संस्थांमध्ये बाह्यशक्तींचा हस्तक्षेप कोणालाही नकोसा असतो. ज्या सहकारी संस्थांमध्ये सरकारचे भाग भांडवल किंवा आर्थिक मदत नाही अशा सहकारी संस्थांमध्ये सरकारचा हस्तक्षेप व्यवहारिक नाही. परंतु ज्या सहकारी संस्थांमध्ये शासनाचे भाग भांडवल किंवा आर्थिक मदत आहे अशा सहकारी संस्थांवर शासनाचा हस्तक्षेप राहणे अपेक्षित आहे. केंद्र शासनाने ९७ वी घटनादुरूस्ती करून नवा सहकार कायदा अमलात आणला आहे. **ह्या नव्या सहकारी कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी देशातील सर्व राज्य सरकारांना १५ फेब्रुवारी २०१३ ही अखेरची मुदत दिलेली आहे.** जर आपल्या राज्याने १५ फेब्रुवारी २०१३ पर्यंत विद्यामान सहकारी कायद्यामध्ये ९७ व्या घटना दुरूस्तीप्रमाणे अपेक्षित बदल केला नाही तर आपोआप ही दुरूस्ती महाराष्ट्र राज्यातील सर्व सहकारी संस्थांना लागू होणार आहे. म्हणजेच महाराष्ट्र राज्य सरकारने १५ फेब्रुवारी २०१३ पर्यंत सर्व सहाकरी संस्थांना हा कायदा बंधनकारक करावा लागणार आहे. त्यामुळे ह्या शिल्लक राहिलेल्या कालावधीमध्ये सहकार चळवळ आपल्या हातातून निसटू नये म्हणून सहकारी संस्थांच्या आधारे आपले चौफेर राजकारण आणि जनाधार टिकविण्यासाठी ह्या कायद्यात नवीन तरतुदीचा समावेश करण्याची धडपड सरकारची चालू असल्याची सर्वत्र चर्चा आहे. महाराष्ट्र राज्यात सहकार आणि राजकीय क्षेत्रात नवीन सहकार कायद्याने खळबळ उडवून दिलेली आहे.



या कायद्यातील नवीन तरतुदीमुळे सहकार चळवळीची म्हणजे आपली वाट लागणार, सहकाराचे खाजगीकरण होणार इत्यादी तर्कवितर्क करून सहकारी संस्थांवर सर्व अधिकार केंद्र सरकारला मिळणार अशा प्रकारच्या चर्चेला सहकार क्षेत्रात ऊत आलेला आहे. राज्यातील सहकारावर वर्चस्व ठेवण्यासाठी आणि त्यासाठी वाटेल त्या थरावर जाण्यासाठी संबंधीत सत्तेतील राजकीय पक्ष वेगवेगळ्या प्रकारच्या क्लुप्त्या आखत असल्याची बातमी चौफेर उधळलेली आहे. नवीन

कायद्याप्रमाणे सहकारी संस्थांवरील सरकारचे नियंत्रण कमी करून सहकारी संस्थांनाच अधिकाधिक स्वायत्ता देण्याची तरतुद समाविष्ठ करण्यात आलेली आहे. **प्रामुख्याने सहकारी संस्थांनी लेखापरिक्षण स्वत:च करावयाचे आहे. संचालक मंडळ सदस्यांची संख्या २१ पेक्षा जास्त ठेवता येणार नाही व संचालक मंडळामध्ये अनुसुचित जाती किंवा जमाती यांचा एक व महिलांमधून दोन असे संचालक असतील. तसेच संचालक मंडळाचा कालावधी ५ वर्षांचा राहील. शिवाय संचालक मंडळातील रिक्त झालेल्या जागा भरण्याची कार्यपध्दती तज्ञ व अनुभवी संचालकाची स्विकृती करणे व समितीवर फंक्शनल संचालकांची नियुक्ती करणे, ह्या आवश्यक तरतुदी आपापल्या उपविधीमध्ये सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांनी (नागरी सहकारी पतसंस्थांसह) १५ फेब्रुवारी २०१३ पुर्वी करावयाच्या आहेत.**

म्हणजेच ज्या सहकारी संस्था ९७ व्या घटना दुरूस्तीच्या अन्वयाने आपापल्या उपविधीमध्ये १५ फेब्रुवारी २०१३ पुर्वी बदल करणार नाहीत अशा संस्थांवर प्रशासकाची नियुक्ती करण्यासाठी सहकार खाते कारवाई करणार आहे. म्हणून वरील बाबी विचारात घेऊन सर्व सहकारी संस्थांनी (नागरी सहकारी पतसंस्थांसह) आपापल्या उपविधीमध्ये दिनांक १५ फेब्रुवारी २०१३ पर्यंत सुधारणा करून घ्यावी. व त्यानंतरच नवीन संचालक मंडळाची निवडणुक घेण्याची कार्यवाही करावी. कारण ९७ घटना दुरूस्तीच्या अनुषंगाने राज्याच्या सहकार कायद्यात सुध्दा राज्य सरकारला १५ फेब्रुवारी २०१३ पुर्वी घटनेच्या सुसंगत सुधारणा करावी लागणार आहे.

ज्या सहकारी संस्थांमध्ये सरकारचे भाग भांडवल / आर्थिक मदत नाही अशा संस्थांवर सरकारचा आता अधिकारी नसणार आहे. त्यामुळे तथाकथित सरकारचे पित्त खवळले असून सहकारातील आपला हस्तक्षेप कायम ठेवण्यासाठी सरकारचा नव्या सहकार कायद्याला जसाच्या तसा आणण्यासाठी अंतर्गत विरोध होत आहे. परंतु ही घटनादुरूस्ती असल्यामुळे देशातील सर्व राज्य सरकारांना त्याची अंमलबजावणी १०० टक्के करणे बंधनकारक आहे. **मुळ घटना दुरूस्तीला अथवा उदेशाला बाधा आणून अधिक तरतुदीचा समावेश राज्य सरकार कदापी करू शकणार नाही.** सहकार क्षेत्र हे सहकारी संस्थांमधील कार्यकर्त्यांच्या हातात रहावे, परंतु कार्यकर्ते आपल्या हस्तक्षेपामधील असावे याची तजबीज करण्यासाठी तारेवरची कसरत संबंधितांना करावी लागत आहे. परंतु संबंधितांना ह्यात यश येईल असे वाटत नाही.

**कालांतराने संपूर्ण देशात प्रामुख्याने महाराष्ट्र राज्य डोळ्यासमोर ठेवून मंत्रीगणांना एखाद्या सहकारी संस्थेत निवडणुकीने किंवा स्विकृत्तीने संचालक मंडळाचे सदस्य सुध्दा होण्यास कायद्याने मज्जाव केला जाईल अशी एकंदरीत व्युहरचना दिसते.** कारण महाराष्ट्र राज्यापुरते बोलायचे झाले तर महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, सहकारी साखर कारखाने व सहकारी सुत गिरण्या व इतर फेडरल संस्थांमध्ये मंत्रीगण आणि/किंवा त्यांच्या संबंधितांमुळे सहकारातील हस्तक्षेपाची पाळेमुळे खोलवर पसरलेली आहेत. महाराष्ट्र राज्याच्या एका वर्षाच्या बजेटपेक्षा कितीतरी पटीने सहकारी संस्थांची आर्थिक उलाढाल आहे. आणि ह्याच गोष्टीचा मुळ आधार पकडून केंद्र शासनाने ९७ वी घटनादुरूस्ती करून घटनेतील कलम ४३ बी नुसार सहकार कायद्यात दुरूस्ती केली आहे. त्या संस्थेत कोण संचालक आहेत, त्याचा गॉडफादर कोण, राजकीय पार्श्वभुमी, गट - तट, पक्षीय राजकारण करुन आता कोणत्याही सहकारी संस्थेला नोंदणी करता येणार नाही. **घटनेत संस्था नोंदणीचा अधिकार प्रदान केलेला आहे, त्यामुळे तो अधिकार आता नाकारता येणार नाही. कायद्याने दिलेल्या तरतुदीचा कुठेही भंग न करता देशातील सर्व राज्य सरकारांनी सहकार चळवळीला प्रोत्साहन द्यावे, मात्र हस्तक्षेप करू नये.** शिवाय भाग - भांडवल, आर्थिक मदत, पॅकेज सवलत इत्यादीबाबत सहकारी संस्थांना दुजाभावाची वागणूक देता येणार नाही. म्हणून ९७ वी घटनादुरूस्ती ही क्रांतीकारक पावलाची सुरवात आहे हेच भविष्यकाळात निष्पन्न होणार आहे.

महाराष्ट्र राज्यातील पतसंस्थांनी ह्याबाबत निश्चिंत रहावे. ह्यापुर्वी पतसंस्थांना कुठल्याच सरकारने कायदा बदलापूर्वी किंवा बदलानंतर कुठलीही मदत केलेली नाही. व कसलेही संरक्षण दिलेले नाही. **यासाठी आपणास पतसंस्थांचे थकबाकीसारखे प्रश्न सोडविण्यासाठी स्वतःचीच यंत्रणा आणखी कार्यरत करावी लागणार आहे.** निर्भिडपणे व आत्मविश्वासने अन्यायाचा मुकाबला करण्यासाठी व आपल्याला सरकार काही मदत करत नाही हे लक्षात ठेवून, आपली मानसिकता त्या दिशेने कार्यरत ठेवावी ही पुन्हा एकदा आठवण या निमित्ताने करून देत आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**